# गाव आरोग्य समिती आणि आशा



गाव आरोग्य समिती म्हणजे गाव आरोग्य पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती

# आशा- गावातील आरोग्य कार्यकर्ती - आरोग्यासाठी मदतीचा पहिला हात.





## आशाची कामे



साध्या आजारांवर प्राथमिक उपचार करणे.



सरकारी आरोग्य सेवकांसोबत (ए.एन.एम., एम.पी.डब्ल्यू.) गावातील आरोग्य सेवांसाठी पुढाकार घेणे.



गंभीर आजारी व्यक्तींना आरोग्य केंद्रात नेण्याचा सल्ला देणे किंवा गरज भासल्यास सोबत जाणे.



आरोग्य सेवकांबरोबर गावात संवाद घडवणे.




लोकांना आरोग्याबद्दल माहिती देणे.

# आशा- गावातील आरोग्य कार्यकर्ती. आरोग्यासाठी मदतीचा पहिला हात.





## आशाची कामे



गावाची आरोग्य योजना तयार करण्यात सहभागी होणे.



केलेल्या कामाची नोंद करणे
व त्याचा अहवाल तयार करणे.



आरोग्य सेवा नीट मिळत नसतील
तर लोकांच्या बरोबरीने
त्याची मागणी करणे.

# गाव आरोग्य समितीची कामे (समितीमध्ये आशाचा सक्रिय सहभाग)



गाव आरोग्य समितीची सदस्य तसेच गावातील आरोग्य कार्यकर्ती म्हणून आशाने समितीमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे.



गाव बैठक - आरोग्याचे हक्क कोणते आहेत याची गावात माहिती सांगणे.



गावातील आरोग्याचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणे. गावातील आरोग्याचे प्रश्न लक्षात घेऊन गावाची आरोग्य योजना तयार करणे.

आरोग्य शिबिरं/मेळावे



खड्डे बुजवणे/ सांडपाण्याची योग्य व्यवस्था

संदर्भसेवेसाठी

गावातील आरोग्याचे प्रश्न लक्षात घेऊन 'मुक्त' निधीचे नियोजन करणे.

# गाव आरोग्य समितीची कामे (समितीमध्ये आशाचा सक्रिय सहभाग)





गावात आरोग्य सेवांवर नियमित देखरेख करण्यासाठी माहिती गोळा करणे.








गोळा केलेल्या माहितीनुसार गाव आरोग्य प्रगतीपत्रक भरणे.



आपल्या गावातील आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी जनसुनवाईमध्ये सहभागी होणे.

# गाव आरोग्य समितीची कामे (समितीमध्ये आशाचा सक्रिय सहभाग)






दर महिन्याचा आरोग्य दिन वेगवेगळे उपक्रम घेऊन साजरा करणे.



ए.एन.एम. आणि एम.पी.डब्ल्यू. यांच्या गावभेटी नियमित होण्यासाठी गाव आरोग्य सेवा कॅलेंडर





गावात आरोग्य तपासणी शिबीर व पौष्टिक आहाराविषयक मेळावे घेणे.




गावातील पिण्याच्या पाण्याची तपासणी करणे.

# गाव आरोग्य समिती व आशाचा समन्वय






आशा व समिती दोघेही गावातील लोकांच्या आरोग्यासाठी काम करतात.
समितीतील लोकांचा व आशांचा समन्वय झाल्यास गावात चांगल्या प्रकारे
आरोग्याचे काम होऊ शकते.

# गाव आरोग्य समितीचा आशाच्या कामाला पाठिंबा व देखरेख



## गावात काम करताना आशाला येणाऱ्या अडचणी



गंभीर आजारी व्यक्तीसाठी वाहन व्यवस्था करताना अडचणी



आजारी व्यक्तीला दवाखान्यात नेल्यावर येणाऱ्या अडचणी





लोकांचा अपुरा सहभाग



टिंगल टवाळी

गाव आरोग्य समितीने आशाच्या कामाचा आढावा घ्यावा तसेच गावात काम करताना आशाला येणाया अडचणींची चर्चा करून त्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

# गाव आरोग्य समितीचा आशाच्या कामाला पाठिंबा व देखरेख



## आशाला येणाऱ्या अडचणीं सोडविण्यासाठी समितीच्या सदस्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवर प्रयत्न करायला हवा.

उदा.-औषध पुरवठा, मानधन, आरोग्य सेवकांचे सहकार्य/वागणूक







गावात आरोग्याचे काम करण्यासाठी आशाला भरपूर वेळ खर्च करावा लागतो. परंतु तिला ठराविक कामाचा मोबदलाही नीट मिळत नाही. आशाला केलेल्या कामाचा नियमित मोबदला व औषधे मिळण्यासाठी समितीने प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवर प्रयत्न करायला हवा.

# गावाच्या आरोग्यासाठी समितीची व्यापक भूमिका



आरोग्य हे मुख्यतः अन्न, पाणी यावरच बरेचसे अवलंबून असते. आरोग्य सेवांवर देखरेख करताना आरोग्यासाठी मूलभूत असणाऱ्या अन्न व पाणी यावरही देखरेख करूया.



अंगणवाडीमध्ये मिळणारा पुरेसा व सकस आहार



रेशन दुकानात नियमित व चांगले धान्य



शाळेमध्ये मिळणारे



मध्यान्ह भोजन




पिण्याचे स्वच्छ पाणी

## मूलभूत सेवा-अन्न व पाणी यावर देखरेख



# अब इकट्ठे हो रहे है, लोग मेरे गाँव के...